| **Headline:** Limaye to be new MD & CEO of NSE | |
|---|---|
| **Source:** Maharashtra Times | **Date:** 9 February 2017 |

# विक्रम लिमये पदभार घेणार

**मुंबई :** राष्ट्रीय शेअर बाजाराने (एनएसई) व्यवस्थापकीय संचालक व सीईओपदी निवड केलेल्या विक्रम लिमये यांच्या नावावर बाजाराच्या संचालक मंडळाने शिक्कामोर्तब केले आहे. विक्रम लिमये २००५पासून आयडीएफसीमध्ये कार्यरत आहेत. एनएसईमध्ये त्यांची नेमणूक पाच वर्षांची आहे. लिमयेंचा कार्यकाळ त्यांनी पदभार स्वीकारल्यापासून सुरू होणार आहे.